जनसंपर्क कक्ष

22 JAN 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जमिनीत पुरा दिनदर्शिकेचे पान, उगवतील फुले छान

## कॉन्झर्व्हेशन फाउंडेशन ऑफ इंडियाची दिनदर्शिका : कुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कॉन्झर्व्हेशन फाउंडेशन ऑफ इंडियाच्या वतीने नवीन वर्षासाठी पुनर्प्रक्रिया केल्या गेलेल्या कागदापासून तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. शाश्वत ऊर्जा हा विषय आदिश अमरदीप पाटील यांनी कलाकारीतून रेखाटला आहे.

या दिनदर्शिकेच्या प्रत्येक कागदात विविध वनस्पतींच्या उच्च उगवण क्षमता असणाऱ्या फुले, भाजीपाला व औषधी वनस्पतींच्या बिया समाविष्ट केलेल्या असून, दर दोन महिन्यांसाठी अशी सहा पाने आहेत, प्रत्येक वर्षी



'दी कॉन्झर्व्हेशन'तर्फे तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. अंजली पाटील, आशिष घेवडे, अमरदीप पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

वेगळी संकल्पना मांडण्यात येते. यावर्षी 'शाश्वत ऊर्जास्रोत' हा विषय घेण्यात आला असून, पवन ऊर्जा, सौर ऊर्जा, जल ऊर्जा, जैव ऊर्जा, समुद्र ऊर्जा व अणू ऊर्जा यांचा समावेश करण्यात आला आहे. महिने संपतील त्याप्रमाणे तो कागद रात्रभर पाण्यात भिजवून जमिनीत रोपण केल्यास त्यातील बियांपासून विविध वनस्पती उगवतात.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भविष्यात पुनःप्रक्रिया केलेल्या कागदाचा वापर जास्तीत जास्त करण्यात यावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, फाउंडेशनचे अध्यक्ष आशिष घेवडे उपस्थित होते. यावेळी ॲडफाइनचे अमरदीप पाटील, आमिर शेख, चैतन्य पोतदार, सौरभ दबडे, मितेष घेवडे उपस्थित होते. डॉ.अंजली पाटील यांनी आभार मानले.

22 JAN 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थी केंद्रित : कुलगुरु शिर्के

गडहिंग्लज : प्रतिनिधी

नव्या राष्ट्रीय धोरणामध्ये विद्यार्थी सक्षम व रोजगारक्षम व्हावा याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना या नव्या शैक्षणिक व्यवस्थेत कौशल्यज्ञान मिळविण्याची संधी आहे. परिपूर्ण विद्यार्थी घडण्याची संधी आहे याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत गुणवत्ता हमी व येथील शिवराज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० स्कुल कनेक्ट' अभियान कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते.



गडहिंग्लज : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे स्वागत करताना प्रा. किसनराव कुराडे. उपस्थित प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांच्यासह अन्य.

प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. डॉ. ए. एम. हसुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे म्हणाले, नव्या पिढीला या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची का गरज आहे याबाबत पालक-विद्यार्थी संवाद साधण्याची गरज असल्याचे सांगितले. सचिव डॉ. अनिलराव कुराडे म्हणाले, विद्यार्थी हिताचा विचार करून शिवराज विद्या संकुलासाठी आवश्यक असे सहकार्य करण्याची विनंती केली. कार्यक्रमास प्रा. बिनादेवी कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्वीजय कुराडे, डॉ. संतोष शहापूरकर, डॉ. किरण पोतदार, प्रा. किशोर आदाटे, संदीप कुराडे, विक्रम शिंदे यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2024

लोकमत

# 'सकारात्मक जगण्याची कला अवगत करा'

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी स्वतःला ओळखण्याबरोबरच सकारात्मक जगण्याची कला अवगत करावी, असा कानमंत्र शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. येथील डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

संस्थेच्या अध्यक्षा माधुरी शिंदे, प्राचार्य डॉ. बी. डी. गिरीगोसावी प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी डॉ. पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण केले. डॉ. ए. बी. पाटील यांनी अहवाल वाचन केले. अभिमन्यू पाटील व तनीषा नलवडे यांना आदर्श विद्यार्थी पुरस्काराने गौरविले. यावेळी डॉ. एन. एन. शिंदे, प्राचार्य शिवाजीराव देशमुख, माजी प्राचार्य डॉ. विलास पोवार, अतुल बोंद्रे, प्रथमेश शिंदे, श्रावणी पाटील, भार्गव उरूणकर, समृद्धी यादव, अफिफा मणेर, डॉ. आर. वाय. माने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2024
लोकमत




उषाराजे हायस्कूलचे सहायक शिक्षक सागर वातकर यांना डॉ. क्रांतीकुमार पाटील व डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शेजारी मान्यवर उपस्थित होते.

# 'ताराराणी आदर्श शिक्षक'ने सागर वातकर सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त देणाऱ्या येणाऱ्या ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्काराने उषाराजे हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक सागर वातकर यांना सन्मानित करण्यात आले.

संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील व शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख दहा हजार रुपये देऊन वातकर यांना हा पुरस्कार प्रदान केला. वातकर हे प्रसिद्ध वक्ते, लेखक व अभ्यासक आहेत.

महाराष्ट्रभर शैक्षणिक व समाज प्रबोधनपर विविध विषयांवर त्यांनी ३०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. यावेळी सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य सी. आर. गोडसे, जे. एस. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2024

'लोकमत

# 'तुकारामांची चित्रप्रतिमा काळानुरूप बदलली'

कोल्हापूर : तुकारामांची चित्रप्रतिमा काळानुरूप बदलत गेली, असे प्रतिपादन जागतिक कीर्तीचे चित्रकार भास्कर हांडे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित 'संत तुकारामांची वास्तविक चित्रप्रतिमा' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

हांडे म्हणाले, तुकारामांच्या वेगवेगळ्या काळातील चित्रप्रतिमांवर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, भौगोलिक घटनांचा परिणाम झालेला दिसून येतो. वेगवेगळ्या काळातील लोकमानसाच्या मनात असणाऱ्या तुकारामांच्या चित्रप्रतिमा त्या त्या काळातील कलावंतांनी निर्माण केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, तुकारामांच्या चित्रप्रतिमेला बहुआयामी पदर आहेत. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

22 JAN 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, को

# भिंतीवरील पेंटिंग स्पर्धेला प्रतिसाद

## महानगरपालिका प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांच्या हस्ते प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डीप क्लीन ड्राईव्ह अंतर्गत मनपातर्फे रविवारी शहरातील मुख्य रस्त्यांवर स्वच्छता केली. तसेच स्वच्छ भारत मिशन अभियान अंतर्गत शहर सुशोभिकरण करण्यासाठी वॉल पेंटिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. जुन्या पुणे बेंगलोर महामार्गावर केएसबीपी चौक ते सायबर चौक दरम्यान शिवाजी विद्यापीठाच्या भिंतीवर वॉल पेंटिंग काढण्यात येत आहे.

स्पर्धेचा शुभारंभ प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांच्या हस्ते रविवारी सकाळी केला. यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसुळ, केशव जाधव, शहर अभियंता हर्षजित घाटगे, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, सहायक आयुक्त विजय पाटील, कर निर्धारक संग्राहक सुधाकर चल्लावाड, कनिष्ठ अभियंता सुरेश पाटील, सुरवसे व आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी १५ कलाकारांच्या संघाने सहभाग घेतला आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांकास २५ हजार व प्रशस्तिपत्र, द्वितीय क्रमांकास २० हजार व प्रशस्तिपत्र तृतीय क्रमांकास १५ हजार व प्रशस्तीपत्र, तीन उत्तेजनार्थांना प्रत्येकी पाच हजार व प्रमाणपत्र तसेच या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेचे मूल्यांकन कला शिक्षकामार्फत व परीक्षण समितीमार्फत करण्यात येत आहे.



कोल्हापूर महानगरपालिका आयोजित वॉल पेंटिंग स्पर्धा रविवारी पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांनी वॉलवर पेंटिंग करून केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ उपस्थित होते.

22 JAN 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकार क्षेत्रात युवा पिढीला बहुस्तरीय संधी

## अरुण काकडे : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : सहकार क्षेत्राचे जाळे व्यापक असून, या क्षेत्राला कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी आवश्यकता आहे. या क्षेत्रामध्ये बहुस्तरीय संधी असून, त्यांचा लाभ घेण्यासाठी युवा पिढीने सज्ज व्हावे, असे आवाहन सहकारी संस्था, कोल्हापूर विभागाचे विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्ष, बँक ऑफ इंडिया चेअर आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे आयोजित 'सहकार क्षेत्रातील रोजगाराच्या संधी' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.



काकडे म्हणाले, 'महाराष्ट्राचा विचार केल्यास दोन शिखर संस्थांसह राज्यात एकूण २ लाख २२ हजार ७२८ सहकारी संस्था आहेत. त्यापैकी कोल्हापूर, सांगली, सातारा या कोल्हापूर विभागामध्येच उपरोक्त सर्वच प्रकारच्या १४ हजार ६७८ सहकारी संस्था आहेत. या संस्थांमध्ये चांगल्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत बोलताना विभागीय सहनिबंधक अरुण काकडे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'सहकाराच्या क्षेत्रात अमाप संधी असल्या तरी, विद्यार्थ्यांनी आपल्याला कोणत्या स्तरावर काम करायचे आहे, याचा निर्णय व्यक्तिगत पातळीवर घेणे गरजेचे आहे.' यावेळी अधिसभा सदस्य संजय परमणे उपस्थित होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

### कठोर परिश्रमाची तयारी हवी

■ काकडे म्हणाले, 'केवळ नोकरीच नव्हे, तर अभिनव स्टार्ट-अप, उद्योग व स्वयंरोजगार तसेच संस्थांच्या स्थापनेच्या शक्यताही या बहुस्तरीय संधींमध्ये आहेत. मात्र, त्या प्राप्त करण्यासाठी आत्मविश्वासासोबतच कामावरील श्रद्धा आणि कठोर परिश्रम यांची मात्र तयारी असायला हवी.'

27 JAN 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोशवाङ्‌मयांमधून भाषा संवर्धनाचे कार्य : डॉ. शिंदे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : कोशवाङ्‌मय हा महत्त्वाचा दस्तावेज आहे. कोशवाङ्‌मयाची निर्मिती करताना आणि नोंदी लिहिताना त्यामध्ये वस्तुनिष्ठता आणि अद्ययावतता असायला हवी. मराठी विश्वकोशाने कोशवाङ्‌मयामधून भाषा संवर्धनाचे मूलभूत कार्य केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि विश्वकोशाचे जनक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे ऋणानुबंध होते. जगाचे ज्ञान विश्वकोशांच्या माध्यमातून उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विश्वकोशामध्ये योगदान देणे गरजेचे असल्याचे प्राचार्य साळुंखे यांनी सांगितले.



कोल्हापूर : मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळेत ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांचे स्वागत श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांनी केले. यावेळी डावीकडून गीतांजली साळुंखे, आर. आर. कुंभार, सरोजकुमार मिठारी, एकनाथ आळवेकर आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. नंदकुमार मोरे म्हणाले, ''व्यक्तिमत्त्व विकासात या साहित्य आणि कोशवाङ्‌मयांशी मैत्री केली पाहिजे.'' विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक सरोजकुमार मिठारी यांनी विश्वकोश परिचय करून देऊन संकेतस्थळ सादरीकरण, नोंदलेखनपद्धती आणि प्रक्रिया यांवर मार्गदर्शन केले. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. गिरीश मोरे, सर्जेराव पद्माकर, मनीषा नायकवडी यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी मराठी विश्वकोश गीत आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या शुभेच्छा संदेशाची चित्रफीत दाखविण्यात आली. आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. एकनाथ आळवेकर, कैलास पाटील, प्रदीप पाटील, स्वप्नील बुचडे, आदी उपस्थित होते. प्रा. गीतांजली साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. तर प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी. विद्यापीठ. कोल्हापूर
22 JAN 2024
सकाळ

# ‘शैक्षणिक धोरण जुन्या, नव्या ज्ञान परंपरांना जोडणारा दुवा’

कोल्हापूर, ता. २१ : नवीन शैक्षणिक धोरण ही जुनी आणि नवीन भारतीय ज्ञान परंपरांना जोडणारा दुवा आहे, असे मत हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातील डॉ. प्रकाश कोपार्डे यांनी व्यक्त केले.

महावीर महाविद्यालयात इतिहास विभागामार्फत ‘सामाजिक शास्त्रातील भारतीय ज्ञान परंपरा’ यावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. यावेळी ते बोलत होते.

संस्थेचे सचिव एम. बी. गरगटे यांनी उद्‌घाटन केले. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे प्रमुख उपस्थित होते. इतिहास विभाग प्रमुख डॉ. महादेव शिंदे यांनी प्रास्तविक केले. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असणारा देश आहे. भारतीय तरुणांना कौशल्याधारित शिक्षण देण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांची जबाबदारी आहे. त्यासाठी त्यांनी सक्षम बनावे, असे सांगितले.

भारतीय ज्ञान परंपरा अभ्यासक्रमाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहावे, असे आवाहन भारती विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. विवेकानंद रणखांबे यांनी केले. डॉ. अजितकुमार जाधव यांनी भारतीय ज्ञान प्रणाली हे केवळ सामाजिक शास्त्रालाच लागू होते असे नाही तर सर्व भाषा, कला वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान तत्त्वज्ञान या क्षेत्रास ही लागू होते, असे मत व्यक्त केले. डॉ. शशिकांत अन्नदाते, प्रा. चंद्रशेखर काटे, प्रा. विकास नाईक, प्रा. पियुष डहाळे, प्रा. अजित पाटील, प्रा. सुरज चौगुले यांनी परिश्रम घेतले. प्रा. रोहिणी औतडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. महादेव शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2024
सकाळ

# प्रजासत्ताक दिनानिमित्त चर्चासत्र

कोल्हापूर : प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, राज्यशास्त्र विभाग, गांधी अभ्यास केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे गुरूवारी (ता. २५) चर्चासत्र होणार आहे. सकाळी साडेदहा ते दुपारी साडेचार यावेळेत 'भारतीय गणराज्य आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग' या विषयावर चर्चासत्र होईल, अशी माहिती अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी दिली.